3.3.4




Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे

## व्यक्तित्व, साहित्य आणि तत्त्वज्ञान

**1st October, 2019**




Organized By:

**Department of Marathi**

Shri Sharda Bhavan Education Society's

**Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed, Dist. Nanded-Maharashtra -India**

Edited by

Dr Ramesh Kadam

Dr Madhav G. Baswante

Mr Sandeep Korde

# अनुक्रमणिका

१. तमाशा कलावंतांच्या जीवनाचा आरसा : वैजयंता- प्रा. डॉ. विद्यादेवी कांबळे १
२. अण्णा भाऊ साठेच्या कादंबरीतील बंडखोर स्त्रीपात्र : आवडी - डॉ.मुक्ता निवृत्ती बिरादार ३
३. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' या कादंबरीच्या पूर्वार्धातील व्यक्तिरेखांचा चिकित्सक अभ्यास - डॉ. शारदा विजय निवाते ६
४. अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील स्त्री प्रतिमा- अनिता नामदेवराव रानवळकर १०
५. अण्णा भाऊ साठे आणि कम्युनिष्ट चळवळ- डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे १२
६. अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी वाङ्मयातून घडणारे मुंबई आणि महाराष्ट्राचे दर्शन : एक आकलन- डॉ.मारोती दशरथ कसाब १६
७. अण्णा भाऊ साठे यांच्या वाड्.मयातील स्त्री प्रतिमा- मिनाक्षी भोजराज गोणारकर २२
८. अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार : एक समाजशास्त्रीय अध्ययन- प्रा.डॉ.कांबळे भरत मसाजी २४
९. अण्णा भाऊ साठे : जीवन, साहित्य आणि तत्वज्ञान-प्रा.डॉ.बाबुराव लक्ष्मणराव घायाळ २६
१०. अण्णा भाऊ आणि संयुक्त महाराष्ट्र-डॉ. नवनाथ गोरे २८
११. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा-उपप्राचार्य प्रा. नागनाथ करडे ३१
१२. अण्णा भाऊ साठे : विद्रोही साहित्याचे जनक-प्रा. मोरे पंडित किशनराव ३४
१३. अण्णा भाऊच्या कांदबरीतील ग्रामजीवन (फकिरा व आवडी)-डॉ. संजय जगताप ३६
१४. अण्णा भाऊ साठे वाङ्मयातील स्त्री प्रतिमा- प्रा. डॉ. दिलीप सावंत ३८
१५. विषमतेविरुद्धचा एल्गार : अण्णा भाऊंची कविता जग बदल घालुनी घाव-प्रा.डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे ४१
१६. साम्यवादी विचारवंत अण्णा भाऊ साठे-प्रा. डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे ४४
१७. अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ-प्रा. डॉ. संजय भाऊराव गिरे ४६
१८. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-डॉ. आसाराम भगवानराव तोंडे ४९
१९. अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे-प्रा.डॉ.साहेबराव भानुदासराव शिंदे ५३
२०. अण्णा भाऊ साठे : एक प्रतिभासंपन्न साहित्यिक-प्रा.डॉ. राजेश धनजकर ५६
२१. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या वाडयमयातील स्त्री प्रतिमा-लखन दिगांबर कत्तेवार ५९
२२. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील विद्रोही 'स्त्री' पात्रे-प्रा.डॉ.मधुकर बैकरे ६२

ISBN : 978-81-922248-7-9

| | | |
|---|---|---|
| २३. | अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील मानवतावादी तत्त्वज्ञान-प्रा. सौ.बेटकर व्ही. सी. | ६५ |
| २४. | अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यलेखनविषयक विचार-प्रा.डॉ.खुशाल पांडुरंग वाघमारे | ६७ |
| २५. | अण्णा भाऊ साठे यांच्या निवडक कादंबऱ्यातील स्त्री प्रतिमा-प्रा. सविता कोकाटे परांडे | ६९ |
| २६. | अण्णा भाऊ साठे यांची लेखनशैली-प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर | ७२ |
| २७. | अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील स्त्री प्रतिमा-स्वाती रखमाजी बोढरे | ७५ |
| २८. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्याचे स्वरुप आणि विशेष : एक अभ्यास-प्रा.संजय नामदेवराव आठवले | ७७ |
| २९. | अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील जीवनसंघर्ष -डॉ. संभाजी शिवाजी जाधव | ८१ |
| ३०. | अण्णा भाऊ साठेंचे कथाविश्व- प्रा.डॉ.संतोष विष्णू चतुर | ८४ |
| ३१. | अण्णा भाऊ साठे यांची लेखनशैली-संतोष रघुनाथ कांबळे | ८७ |
| ३२. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद-प्रा.डॉ.वनमाला लोंढे | ८९ |
| ३३. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्ध लढणारी विद्रोही स्त्री-डॉ.विष्णू काळबा कांबळे | ९१ |
| ३४. | अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-डॉ.अलका प्रदीप वालचाळे (सरोदे) | ९६ |
| ३५. | अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व- दगडूबा कोंडीबा माघाडे,प्रा.डॉ.अशोक पाठक | ९९ |
| ३६. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील सामाजिक जाणिवा- साबळे पल्लवी भगवान | १०१ |
| ३७. | माकडीचा माळ कादंबरीचे सामाजिक आकलन-प्रा.डॉ.अतुल नारायण चौरे | १०३ |
| ३८. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीविश्वातील समाजजीवन-सिद्धार्थ बाबुराव नवतुरे | १०६ |
| ३९. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील सामाजिक तत्वज्ञान-गायत्री आनंद भरनाळे | १०८ |
| ४०. | अण्णा भाऊ साठे : एक सिद्धहस्त कथाकार-प्रा. डॉ. नामदेव सोडगीर | ११२ |
| ४१. | जग बदलाचा महान मंत्र आणि आंबेडकरी क्रांतीसूत्रे-डॉ. कीर्तीकुमार मोरे | ११७ |
| ४२. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे व्यक्तित्व, साहित्य आणि तत्वज्ञान-प्रवीण शंकर सोलनकर | १२२ |
| ४३. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य-कु. स्नेहा नरेशराव ढांगे | १२६ |
| ४४. | अण्णा भाऊ साठे आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ-पालंचेवार पोतन्ना गंगन्ना | १३० |
| ४५. | अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार-डॉ.लक्ष्मण एस.पवार | १३३ |
| ४६. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : व्यक्तित्व,साहित्य आणि तत्वज्ञान - डॉ. शिवाजी सोमला पवार | १३५ |
| ४७. | जनमाणसातील लेखक : अण्णा भाऊ साठे-प्रा.कांबळे डी.आर. | १३९ |

ISBN : 978-81-922248-7-9

४८. अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे- डॉ.शैलश पांडुरंग कांबळे १४१

४९. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजभान-हत्तिअंबीरे प्रदीपकुमार मारोती १४६

५०. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील व्यक्तिरेखा-श्री वृंदावन निवृत्ती नामवाडे १४९

५१. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यलेखन विषयक विचार-प्रा. अरुण डी. मोरे १५२

५२. अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी विश्व-बनकर माणिक नामदेव १५४

५३. प्रबोधक साहित्यिक : अण्णा भाऊ साठे-डाखोरे ज्ञानेश्वर काशिनाथराव १५८

५४. 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवासवर्णनाचा शैली वैज्ञानिक अभ्यास-प्रा.गायकवाड देविदास बाबुराव १६१

५५. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : एक अभ्यास-डॉ.पंढरी डोईफोडे १६४

५६. अण्णा भाऊ साठे यांच्या कांदबरीतील स्त्री प्रतिमा-प्रा. कैलास तातेराव गवळी १६६

५७. अण्णा भाऊ साठे : जातपितृसत्तेला सुरूंग लावणारी वैजयंता कादंबरी-आरती केशवराव गायकवाड १६९

५८. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायक- प्रा.डॉ.नरसिंग कदम १७२

५९. अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व-प्रा.डॉ. किरण प्रभाकर वाघमारे १७५

६०. अण्णा भाऊ साठे यांचे कादंबरी विश्व-प्रा. कृष्णा सुदाम इंगळे १८०

६१. अण्णा भाऊंची शाहिरी कविता - पोवाडे-प्रा. नवनाथ निवृत्ती बेडे १८३

६२. अण्णा भाऊ साठे यांच्या कथात्म साहित्यातील वंचितांचे जीवन- डॉ. संजय प्रकाश बालाघाटे १८६

६३. अण्णा भाऊ साठे यांच्या वाङमयातील स्त्री प्रतिमा - हर्षवर्धन सं. कोल्हापूरे १८९

६४. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे संदर्भ - डॉ. प्रदीप औजेकर १९२

६५. अण्णा भाऊंची 'माझी मैना गावावर राहिली' - प्रा. डॉ. संभाजी बाबाराव सावंत १९५

६६. अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक व सामाजिक विचार - प्रा. डॉ. हरिहर शिवदास मोहोकार १९७

६७. आण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार - प्रा. सदाशिव राजाराम भुयारे १९९

६८. क्रांतिकारी साहित्यिक - अण्णा भाऊ साठे - डॉ. लहू दिगंबर वाघमारे २०४

६९. शाहिरांचा शिरोमणी : अण्णाभाऊ - प्रा.दत्ता म.बडुरे २०९

७०. 'फकिरा'तील व्यक्तिरेखांचे स्वरुप - प्रा.डॉ.संजय हापगुंडे २११

७१. साहित्यकलेतील उत्तुंग मनोरा : अण्णा भाऊ साठे - प्रा. डॉ. गोविंद शंकरराव रामदिनेवार २१५

७२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील परिवर्तनवाद - प्रा.डॉ. एन.के. वाघमारे २१९

७३. अण्णा भाऊ साठे यांचे प्रवासवर्णन - प्रा.डॉ.जगदाळे किरण आगतराव २२१

ISBN : 978-81-922248-7-9

| | | |
|---|---|---|
| ७४. | ‘फकिरा’ सामाजिक समानता की गाथा – प्रा.डॉ. संजय गणपती भालेराव | २२४ |
| ७५. | एक क्रांतिकारी कवि, लेखक तथा समाजसुधारक अण्णा भाऊ साठे – डॉ. शेख शहेनाज अहेमद | २२८ |
| ७६. | अण्णा भाऊ साठे के उपन्यासों में स्त्री चित्रण – विजया सोपानराव उफाडे | २३१ |
| ७७. | साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे का साहित्य – सावते प्रकाश नवनीतराव | २३३ |
| 78. | Anna Bhau Sathe : An Overview - Vaishali Onkar Shelar | 235 |
| 79. | Modern and Scientific views in the short story of Anna Bhau Sathe Barbadya Kanjari - Dr. Prakash B. Bhange | 238 |
| 80. | Proletariun World view in the Literature of Anna bhau Sathe - Dr.S.P.Balkhande | 242 |
| 81. | ‘Anna bhau Sathe’ Hero of Joint Maharashtra Movement - Dr.B.S. Sawke | 248 |
| 82. | Manifestation of Caste and Class in Anna Bhau Sathe’s ‘Fakira’ - Mr. Waghmare Sanjay Shamrao. | 251 |
| 83. | Anna bhau Sathe: Charitra Ani Vangmayin Karya - Mr. Sambhaji Dadarao Patil | 256 |
| 84. | Tukaram Bhaurao Sathe: A Versatile Litterateur Dr. Chandrashekhar Ashok Dawane , Dr. Anuja Anirudh Jadhav | 259 |
| 85. | A Brief Review Of Film Adaptation Based On Anna bhau Sathe’s Literary Work *-Miss. Jyoti Ramchandra Lekule* | 262 |
| 86. | Theme of an Adventure and Problems of Women in the Novels of Anna Bhau Sathe -Dr.Dhaware Rahul Pralhad, | 269 |


***

ISBN : 978-81-922248-7-9

# जग बदलाचा महान मंत्र आणि आंबेडकरी क्रांतीसूत्रे

**डॉ. कीर्तीकुमार मोरे,**
(मराठी विभाग प्रमुख)
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड

लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांनी विविध वाड:मयप्रकारातील साहित्य लेखनाने सबंध महाराष्ट्राला एका नव्या उपेक्षित जगाची ओळख करून दिली. हे त्यांचे अलौकीक कर्तृत्व महाराष्ट्र विसरू शकत नाही. घ्साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठेङ ही उपाधी त्यामुळेच त्यांच्यासाठी सार्थ ठरते. १९५८ च्या दलित साहित्य संमेलनातील उद्‌घाटकीय भाषणातील त्यांचे उद्‌गार सर्वविदीत आहेत. ते म्हणाले होते, घ्ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून कष्टकज्यांच्या तळहातावर तरली आहे.छ या विधानामुळे आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील त्यांच्या योगदानाने त्यांना मार्क्सवादी ठरविले. परंतू अण्णाभाऊनी एक कवन रचले ज्यात त्यांनी जग बदलाचा मार्ग विशद केला. घ्जग बदल घालूनी घाव मला सांगून गेले भीमरावङ असे ते कवन आहे. या कवनाची आणि त्याच्या आशयाची सार्थता, उचितता, व उपयोगिता मात्र समजून घेतली जात नाही.

अण्णाभाऊंचे ते चिरपरिचित कवन असे...

जग बदल घालूनी घाव। सांगुन गेले मला भीमराव।।
गुलामगिरीच्या या चिखलात रूतून बसला का ऐरावत।
अंग झाडूनी निघ बाहेरी। घे बिनीवरती धाव।।
धनवंतांनी अखंड पिळले। धर्मांधांनी तसेच छळले।
मगराने जणू माणिक गिळीले। चोर जाहले साव।।
ठरवून आम्हा हीन अवमानीत। जन्मोजन्मी करूनी अंकित।
जिणे लादूनी वर अवमानीत। निर्मून हा भेदभाव।।
एकजुटीच्या या रथावरती। आरूढ होऊनी चल बा पुढती।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती। करी प्रगट निज नाव।।

हे कवण अण्णाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी लिहिले. या गीताची निर्मिती प्रक्रिया सांगताना असे सांगितले जाते की, डॉ. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर श्रध्दांजलीचे कार्यक्रम सबंध भारतभर होत होते. महाराष्ट्रातील मान्यवर कलावंतांनीही अशाच एका श्रध्दांजलीपर कार्यक्रमाचे आयोजन केले. अंधेरीत एक हॉल बुक केला गेला. या कार्यक्रमात सहभागी कलावंत होते वामनदादा कर्डक, भिकू भंडारे, गोविंद म्हशीलकर, प्रल्हाददादा शिंदे, विठ्ठल उमप, विठ्ठल शिंदे आणि अण्णाभाऊ साठे. याच कार्यक्रमात वामनदादा कर्डक यांच्या सांगण्यावरून अण्णाभाऊंनी हे गीत लिहिले आणि सादरही केले.

हे कवण अर्थपूर्ण, अर्थवाही दलित-शोषितांच्या आर्थिक, सामाजिक वेदनेवर मर्मग्राही भाष्य करते. वर उल्लेखिलेली निर्मितीप्रक्रिया पाहता अण्णाभाऊंनी हे कवण उत्स्फूर्त रचले असे म्हणता येते. अण्णांच्या शीघ्रकवित्वाचा नमूना म्हणूनही ते महत्वाचे ठरते. पण साहित्य अभ्यासकांनी, संशोधकांनी हेही लक्षात घ्यायला हवे की उत्स्फूर्त ते अथवा शीघ्र ते उत्तम नसते. तात्काळ लिहिल्या गेलेली कविता, काव्य, कवणे ही तात्कालीक परिणामानंतर विरून जातात. विस्मृतीत जातात. त्याची परिणामकारकता अनंत काळ प्रभावी राहत नाही. घ्जग बदल घालूनी घावङ हे कवण यास अपवाद का ठरावे? याचे कारण असे की अण्णाभाऊ १९४१ पासून लेखन करीत होते. बाबासाहेबांचा नेतृत्वोदय होऊन वीस वर्षांचा काळ लोटला होता. जेंव्हा हे कवण लिहिले गेले तेंव्हा अण्णाभाऊंच्या लेखनाचे वय पंचेवीस वर्षांचे होते. ह्या पंचवीस वर्षांच्या काळात अण्णाभाऊंसारख्या सुज्ञ-संवेदनशील लेखकाने बाबासाहेबांची चळवळ पाहिली. समजून घेतली असावी. ते कधी त्याबाबत बोलतांना, भाष्य करताना दिसले नाहीत पण त्यांच्या नेणिवेत बाबासाहेब नव्हते असे कसे म्हणता येईल? निर्मितीप्रक्रियेचा एक नियम असा आहे की, आपल्या नेणिवेतील विषय साहित्याची निर्मिती होताना उत्स्फूर्तपणे जाणिवेच्या पातळीवर येत असतात. हे मान्य केल्यास या कवणाची उत्स्फूर्तता ही जाणिवेच्या पातळीवर शीघ्रपणे आली त्यामागे अण्णाभाऊंच्या नेणिवेत हे विषय आधीच घोळत होते. १९५६ साली कार्यक्रमाच्या निमित्ताने हा विषय जाणिवेच्या पातळीवर आला इतकेच. या


ISBN : 978-81-922248-7-9

कवणाचा अर्थ समजून घेताना मी जो विचार केला तो पुढीलप्रमाणे....

जग बदलासाठी संघर्ष करावा लागतो आणि हा संघर्ष डॉ. भीमराव आंबेडकरांच्या विचारांतून करावा लागेल याचे सुतोवाच करणारा हा महामंत्र आहे. डॉ. आंबेडकरांचे समग्र जीवनच संघर्षमय होते. त्यांच्या जीवनसंघर्षातूनच क्रांतीचा मार्ग प्रशस्त होत गेला. बाबासाहेबांची सबंध जीवनयात्रा व तत्वज्ञान ह्या क्रांतीच्या दिशेने समाजाला नेते, ती क्रांतीसुक्ते समजुन घेतली की, कोणतीही व्यक्ती, समाज वा राष्ट्र क्रांतीच्या दिशेने सहज प्रवासू शकते.

बाबासाहेबांचे पहिले सूत्र होते, घ्जे इतिहास विसरतात जे इतिहास घडवू शकत नाहीत.ङ क्रांतीच्या दिशेने निघालेल्या व्यक्तीने, समाजाने वा राष्ट्राने त्याच्या वर्तमानात उभे राहून इतिहासाचा शोध घेतला पाहिजे, घ्हू वेअर दी शुद्राज,ङ घ्दी अनटचेबल्स,ङ हू वेअर दे अॅण्ड व्हाय दे बिकेम अनटचेबल्स,ङ या महत्वपूर्ण ग्रंथांची निर्मिती शुद्रातिशुद्रांना त्यांचा इतिहास समजुन देण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. घ्ब्रोकन मॅनङ ची थिअरी विशद केली. शुद्रातिशुद्र या देशाचे भूमिपूत्र होते हे सत्य कथन केले. त्यांच्या वाताहतीला जबाबदार असलेली चातुवर्ण्य व्यवस्था शत्रुस्थानी उभी केली . ही व्यवस्था उध्वस्त झाल्याखेरीज समतेचे राज्य प्रस्थापित होणार नाही, असा सिध्दांत प्रतिपादन केला.

हजारो वर्षे अस्तित्वात असणारी व्यवस्था सहजासहजी उध्वस्त करणे शक्य नव्हते. गरज होती त्यासाठी लोकमानस घडविण्याची. त्यातूनच क्रांतीचे दुसरे सुत्र जन्म घेते ते म्हणजे घ्गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल.ङ आपला अस्पृश्याचा जन्म आपल्या पूर्वजन्मीच्या कर्माचे फलित असल्याचे मानणारी मानसिकता बदलणे सोपे नक्कीच नव्हते. माणूस विचारप्रवृत्त झाला पाहिजे. त्यासाठी तो पहिल्यांदा शिकला पाहिजे. कोणीतरी जबाबदारीने त्यांच्यातील अज्ञान दूर सारून उजेडाचा मार्ग त्यांना दाखवला पाहिजे. ही जबाबदारी बाबासाहेबांनी स्वशिरावर घेतली. आपल्या लेखन भाषणांतून अस्पृश्य समाज जागा केला. त्यांच्या गुलामीची कारणमिमांसा विशद केली. ते म्हणतात, घ्घ्जन्मसिध्द श्रेष्ठतेमुळे व पवित्रतेमुळे गुणहिन ब्राम्हणांचे देखील कल्याण झाले आहे. ब्राम्हणेतरास अयोग्यतेचा जन्मसिध्द मारा आहे. त्यांच्यात विद्या नाही म्हणून ते मागे राहिले आहेत.छ शुद्र अयोग्यतेमुळे व अविद्येमुळे मागे तर अस्पृश्य अपवित्रतेमुळे आणि अविद्येमुळे मागे असल्याचे ते म्हणतात. हा जन्मसिध्द अयोग्यतेचा व अपवित्रतेचा कलंक पुसल्याशिवाय नवसमाजरचनेचे क्रांतीकारी स्वप्न साकार होणार नाही. म्हणून शुद्रातिशुद्रांनी शिक्षणाची कास धरली पाहिजे ही त्यांची भूमिका होती. शिक्षणाने माणूस विचार करू लागतो आणि विचार करणारी माणसे क्रांती करू शकतात, यावर त्यांचा विश्वास होता.

प्रस्थापित व्यवस्थेने ज्यांच्या विचारक्षमतेवर निर्बंध लादले होते. मुखोत्पन्न म्हणून विद्येचे व योग्यतेचे दोर स्वत:च्या ताब्यात ठेवले होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेला धार्मिक अधिष्ठान देवून शुद्रातिशुद्रांचे विद्यार्जन निषिध्द ठरवले होते. त्यांच्यात क्रांतीचे बीज रूजवणे कठीण कर्म होते. ज्या धर्मव्यवस्थेने ज्यांच्या माणूसपणावरच प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. त्यांच्यात माणूस जागवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी संघर्ष केला. महाडचा चवदार तळे सत्याग्रह मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर प्रवेशादी आंदोलनातून हजारो वर्षे गुलामीचे जीवन जगलेला माणूस धर्माविरूध्द उभा राहिला. मनुस्मृतीचे दहन म्हणजे माणूसपणाचा हक्क नाकारणाज्या मनुप्रणीत व्यवस्थे विरूध्दचा नकार होता. चवदार तळे व काळाराम मंदिर प्रवेशाचे लढे समतेची नांदी होते.

डॉ. बाबासाहेबांनी गुलामीची मिमांसा करताना म्हटले आहे की, घ्घ्आम्ही तुडविले जात आहोत याचे कारण आपणास आपल्या अन्यायाचा राग येत नाही हेच आहे. अन्यायाचा प्रतिकार आमच्या पर्वजांनी केला नाही ही त्यांची मोठी चूक होय. आता अपमान सहन करण्याचे दिवस संपले हे आपण आपणांत संघटन करून लोकांच्या नजरेत आणले पाहिजे. शुद्रातिशुद्र माणूस असूनही विद्यार्जनाचा, देवदर्शनाचा, सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा, रस्त्याहून चालण्याचा, चांगले स्वच्छ राहण्याचा हक्क त्याला नव्हता. त्याचे मानवी हक्क त्याला संघटन करून, लढा देवून मिळवले पाहिजेत.छ असे डॉ. बाबासाहेबांना वाटत होते.


ISBN : 978-81-922248-7-9

ठेविले अनंतेच्या संस्कारांनी ज्यांच्या संवेदनाच गोठवल्या होत्या अशा संवेदनशील माणसांच्या जीवनातील जडत्व डॉ. बाबासाहेबांनी घालविले. शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या त्रिसुत्रीने समाज गतिशील केला. त्यांचे संघर्षाचे मार्ग सनदशीर होते. अहिंसात्मक होते. पण त्यांची अहिंसा तुकारामबुवांच्या मार्गाने जाणारी होती. दया तिचे नाव भुतांचे पालन। आणिक निर्दालन, कंटकांचे। अशी ती होती. बाबासाहेबांना अपेक्षित समता, स्वातंत्र्याचे हक्क प्रस्थापित समाजव्यवस्थेकडून सहजासहजी प्राप्त होणे अशक्य होते. म्हणून राजकीय सत्ता प्राप्त केली पाहिजे असे त्यांना वाटत होते. घ्जा आणि तुमच्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा की, तुम्हाला राज्यकर्ता जमात बनायचे आहे.छ हे बाबासाहेबांचे तिसरे क्रांतीसूत्र आहे. ते म्हणतात, घ्प्रत्येक समाजामध्ये काही ना काही सामर्थ्य असते. काहींच्या हातात आर्थिक सामर्थ्य असते, पारशी समाज पहा. तो या ठिकाणी बसलेल्या लोकांपेक्षा काही जास्त नाही परंतु त्याच्यात आर्थिक सामर्थ्य आहे. आपल्या समाजातील काही माणसे त्यांच्याकडे मजुरीची कामे करतात. ब्राम्हण समाजामध्ये जरी आर्थिक सामर्थ्य नाही कारण सर्वच ब्राम्हण काही श्रीमंत आहेत असे नाही परंतु त्याच्या हातात धार्मिक सत्ता आहे. बहुजन समाजाच्या हाती राजकीय सत्ता असणे फार इष्ट आहे. सत्ता बहुजनांच्या हाती असल्यास बहुजनांच्या हिताचे निर्णय घेणे सहज शक्य होईल.छ ही राजकीय सत्ताप्राप्तीमागची त्यांची भूमिका होती. आज दलित बहुजनांच्या राजकारणाची काय स्थिती आहे, ही गोष्ट अलाहिदा, परंतु घ्स्वतंत्र मजूर पक्ष,ङ शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या माध्यमातून बाबासाहेबांनी दलित बहुजनांचे राजकारण केले. यशस्वी राजकारण केले हे सर्वश्रूत आहे. प्रसंगी ब्रिटीशांशी झगडून, अस्पृश्यांच्या स्थितीगतीशी त्यांना परिचित करून देवून त्यांना अस्पृश्यांचे राजकीय हित जोपासले. राखीव जागा शासन व नौकरीत मिळवून दिल्या. कालपर्यंत अलक्षित दिसणारा वर्ग आता राजकीय क्षितीजावर आपली नाममुद्रा कोरताना दिसत आहे, यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय विचार होता. मताचे मूल्य प्राप्त झालेला सामान्य माणूस आणि गडगंज श्रीमंती लाभलेला धनिक बाबासाहेबांनी समपातळीवर आणला. राखीव जागांमुळे व मताधिकारामुळे गावातला एखादा विठ्याही विठ्ठलराव झाला आहे हे बाबासाहेबांच्या राजकीय क्रांतीचे फलितच होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीचे चौथे सूत्र होते, घ्मी हिंदू म्हणून जन्माला आलो हा माझा दोष नव्हे, पण मी हिंदू म्हणून मरणार नाही,छ म्हणजेच धर्मांतर. धर्माच्या नावाखाली हिनत्व देवून एका प्रचंड मोठ्या लोकसमूहाची चाललेली कुचंबना धर्मत्यागाशिवाय थांबणे अशक्य आहे, असे बाबासाहेबांचे मत होते. घ्जर हिंदू आम्हाला हिंदू म्हणवून घेण्यास तयार नाहीत तर आम्ही देखील स्वत:ला हिंदू म्हणवून का घ्यावे?छ हा त्यांचा सवाल होता. धर्मांतराच्या घोषणेने हिंदूंना अस्वस्थ केले. घ्धर्मांतर घर किंवा कपडे बदलण्या एवढी सोपी गोष्ट नव्हे.ङ असे महात्मा गांधी म्हणाले ते या अस्वस्थतेतूनच. परंतू याचा एक सकारात्मक परिणाम
झाला. बाबासाहेबांच्या शब्दांत सांगावयाचे तर, घ्धर्मांतराची घोषणा आपण केल्यापासून तर मुसलमान, शीख, ख्रिश्चन यांच्या तोंडाला पाणी सुटले असून ते आपल्या दाढीला हात लावू लागले आहेत.छ याचा अर्थ असा की, तिरस्काराचा हेटाळणीचा, तुच्छतेचा विषय असलेला समाज धर्मांतराच्या घोषणेमुळे केंद्रवर्ती झाला. अनुकंपेचा विषय असलेल्या समाजाचा अनुनय होवू लागला. हिंदूकडून डॉ. आंबेडकरांच्या मतपरिवर्तनाचे प्रयत्न झाले. बाबासाहेब मुस्लीम अथवा शीख झाले असते तर याची कल्पनाच न केलेली बरी. बाबासाहेबांचे या देशावर नितांत प्रेम होते. म्हणूनच त्यांनी या देशाच्या मातीतला धर्म बौध्दधम्म स्वीकारला. हिंदूंनी बहिष्कृत ठरवलेल्या भारताला त्यांना प्रबुध्द भारत करावयाचे होते म्हणून त्यांनी बौध्दधम्म स्वीकारला.

बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीने काय साध्य केले? तर देव आणि भक्त यांच्यातील दलाल संपवला. शेंदरी देव व त्यांच्या भोवतालचे मिथ्या कर्मकांड संपवले. लोकांमध्ये विज्ञान निष्ठा जागवून स्वयंप्रकाशीत होण्याचे मार्ग प्रशस्त केले. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव न्यायाचे मुल्य चतुष्टय दिले. माणसाला माणूस म्हणून जगण्याची मुभा दिली.

बाबासाहेबांच्या क्रांतीसूत्रांनी बहिष्कृत समाजात अमुलाग्र परिवर्तन झाले क्रांती झाली. मनुप्रणीत समाजव्यवस्थेचे कंबरडे मोडले. संविधानाचा अंमल सुरू झाला. राखीव जागांच्या माध्यमातून समग्र सर्वहारा समाज


ISBN : 978-81-922248-7-9

राजकीय पटलावर आला. शिक्षण व नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. परिणाम स्वरूप सर्व शोषीत, उपेक्षित समाजाला उन्नतीची दारे खुली झाली.

या पार्श्वभुमीवर मातंग समाजाचा विचार करताना काही गोष्टी नजरेसमोर येतात. हा समाजही अस्पृश्य गणला गेलेला समाज आहे. त्याचा इतिहास शौर्याचा, पराक्रमाचा तर आहेच परंतु त्यांचे बौध्द परंपरेशी जैविक नाते आहे. बुध्दकालीन राजा प्रसेनजीत मातंग राजा होता. ज्यांना पुढे बुध्दाचा अनुग्रह प्राप्त झाला होता. बुध्द भिक्खू संघात मातंग भिक्षू होते. आज मातंग समाजावस्थेची कारणमिमांसा केली पाहिजे. बाबासाहेबांनी ज्यांना ब्रोकन मॅन संबोधले त्या वाताहतीत लोकांपैकीच मातंग समाज एक आहे. हे समजून घेतले पाहिजे. त्यांच्या अवनतीचे एक कारण घ्यांनी हिंदू धर्म सोडला नाही.ङ असे सांगीतले जाते. मातंग समाजात धर्मांतराची मानसिकता आहे. त्यासंबंधी दबक्या आवाजात बोलले जाताना दिसते. परंतू धिटाईने कोणी बोलत नाहीत. जर मातंग धर्मांतर करून बौध्द होतील, तर ते त्यांच्या मुळ धर्मात प्रवेशित होताहेत असेच मानले पाहिजे.

मांग आणि आजचे बौध्द यांचे नाते सामंजस्याचे नाही. ते गैर आहे. त्यामागे एक कुटील षडयंत्र आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातीत त्यांच्या चळवळीत काम करणारी घ्मातंग डिप्रेस्ड क्लास मिशनच्याङ अधिवेशनाच्या आयोजकांत एच. डी. बेहाडे नावाचे मातंग कार्यकर्ते होते. आहिल्याश्रमात राहून व्हर्नाकुलर फायनल पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या गीता पवार नावाच्या मातंग मुलीच्या पाठीवर बाबासाहेबांची कौतुकाची थाप पडली होती. गीताबाई पवार यांनी एक खंत व्यक्त केली त्या म्हणतात, घ्मातंग समाजाचे लोक तेंव्हा गांधीजींच्या मागे होते त्यांच्या विचारांचे अनुयायी होते. मला प्रवाहाविरूध्द जाणे जमले नाही.छ याचा अर्थच असा होतो की, गांधी की आंबेडकर या वादात मातंग समाजाने गांधींची बाजू घेतली होती. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या तिकीटावर निवडणुक लढलेले विजयी उमेदवार खासदार देवराव कांबळे हे मातंग समाजाचे होते. येवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली त्यावेळी अनेक ठिकाणी त्यांच्या निर्णयाचे स्वागत करणाज्या सभा झाल्या मातंग व चांभार समाजातील लोकांनीही अशा सभांतून ठराव पास करून बाबासाहेबांच्या निर्णयाचे स्वागत केले होते. मध्यप्रांत वज्हाड, मातंग सोसायटीचे सदस्य मा. एस. एस. बंगाले, यांनी ६ जानेवारी १९६६ ला छापील पत्र प्रसिध्द करून डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरास पाठिंबा जाहिर केला. दुसरा संदर्भ असा की, घ्मुंबईत मातंग मंडळाची सभा होऊन धर्मांतराला पाठींबा देण्याचा ठराव संमत करण्यात आला.छ या संदर्भावरून असे म्हणता येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराला अनुकूल असलेला मातंग समाज बाबासाहेबांसमवेत धर्मांतरालाही अनुकूल असला पाहिजे. मात्र तसे घडले नाही. याचे उत्तर शोधले पाहिजे.

याचे उत्तर एक तर गीताबाई पवार यांच्या मतावरून लक्षात येते की, घ्गांधी व गांधीप्रेरीत काँग्रेसने मातंग समाज आपल्या दिशेने वळवला होता, दुसरे असे की, मातंग कार्यकर्ते सकट यांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मि. सकट यांनी दे दान सुटे गिराण असे ओरडून भीक मागीतली तरी मला वाईट वाटणार नाही. पण ते रमाटे यांच्या नादी लागतील तर मला अत्यंत खेद होईल. निराळे रहा, पण दुसज्याचे बगलबच्चे होवू नका. घ्बाबासाहेबांचा हा गर्भित इशारा समजून घेतल्यास लक्षात येते की, काही मातंग मंडळी काँग्रेसने तर काही जनसंघाने भुलवली होती. आणखी एक महत्वाची गोष्ट अशी की, बाबासाहेबांची मातंग समाजाकडे पाहण्याची दृष्टी काय होती? त्यांनी कधीही मातंगांशी सापत्नभावाने व्यवहार केला काय? याचे उत्तर नाही असेच आहे. बाबासाहेब स्वत:च एके ठिकाणी असे म्हणतात की, घ्मी स्वत: मातंग जातीशी रोटी-बेटी व्यवहार करण्यास तयार आहे. अशी स्थिती असतांना महार मांगात तेढ का असावी हे समजत नाही. मी स्वत: माझ्या घरी मांगाचा एक मुलगा पोटच्या पोराप्रमाणे पाळला होता. अजून कोणी जर मला एखादा मांगाचा मुलगा आणुन देईल तर मी त्याचे पालन पोषण करीन.छ बरे बाबासाहेबांनी ब्रिटीशांशी झगडून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ मिळवलेला होता तो फक्त महारांसाठी नव्हे. गांधींचे प्राण वाचवून केलेल्या समझोत्यातून राखीव जागा मिळवल्या त्याही अस्पृश्यांसाठी महारांसाठी नव्हे.

मातंग समाजातील काही मंडळी स्वतंत्र ८% आरक्षणाची मागणी करताना दितात. त्यामागे १३%


ISBN : 978-81-922248-7-9

आरक्षण महारांनी म्हणजेच नवबौध्दांनी लाटले असल्याचा खोटा, निराधार समज आहे. मुळात हीसुध्दा षडयंत्रकारी व्यवस्थेची त्यांना दिलेली लोणकढी थाप आहे. वास्तव असे की, आजही मातंग समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. जो शिकला तोही आपल्या समाजाकडे मागे वळून पहायला तयार नाही. अंधश्रध्दा, जुनाट व खल्लड पारंपरिक समजुतींतून समाजाला बाहेर काढल्याशिवाय शिक्षणाचा वेलू गगणावरी जाणार नाही. उलट बौध्द व चांभार समाजात शिक्षणाचे प्रमाण बज्यापैकी आहे. स्पर्धेत उतरण्याची तयारी देखील आहे. शिक्षणाच्या अल्पप्रमाणामुळे मातंग समाजाचे लोक काही अपवाद वगळता महत्वाच्या हुद्यांवर प्रमाणाणे कमी दिसतात.

बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या माध्यमातून सर्व जातिक स्तरांतील लोकांना सोबत घेवून यशस्वी राजकारण केले होते. ही बाब तत्कालीन प्रस्थापीत राजकीय धुरीनांच्या लक्षात येताच त्यांनी इंग्रजांच्या फोडा आणि झोडा या उक्तीला सार्थ करीत अस्पृश्यांत फुट पाडण्याचा प्रयत्न केला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनाचा मोठा भाग कम्युनिस्ट चळवळीत गेला हे खरे असले तरी, जेंव्हा ते ‣जग बदल घालुनी घाव मला सांगून गेले भीमरावङ असे म्हणतात तेंव्हा त्यांनी जाणले होते की, मातंगांच्या विकासाची, क्रांतीची पायवाट डॉ. आंबेडकरांच्या विचारांतूनच जाते. म्हणून अण्णाभाऊंच्या जीवनप्रवासाची सांगता आंबेडकरी विचारात होते. आंबेडकरी विचार हाच अण्णाभाऊंना अभिप्रेत असलेल्या जगबदलाची क्रांतीची नांदी आहे. म्हणूनच हा महन्मंत्र मातंग समाजाने खुप आत्मियतेने जपला पाहिजे तद्वतच आंबेडकरी क्रांतीसुत्रांच्या साह्याने आपला उध्दार करून घेण्याच्या दिशेने मार्गक्रमण केले पाहिजे.


ISBN : 978-81-922248-7-9